एसएमएस
SMS
Happiness is like the tip of a tail!
If the cat runs to catch the tail, It has to keep running forever! But if it walks in its own
style the tail follows! Live your own lifestyle!



# एमबीए प्रवेशाचे अर्ज स्वीकृतीस सुरवात

पिंपरी, ता. १७ : निगडी येथील पिंपरी-चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (एसबीपीआयएम) महाविद्यालयात एमबीएच्या प्रवेशासाठी अर्ज स्वीकृतीस सुरवात झाली आहे.

पिंपरी-चिंचवड भागातील विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी अर्ज स्वीकृती केंद्र (एआरसी) म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. एमबीए अभ्यासक्रमाच्या २०१५ या शैक्षणिक वर्षामध्ये प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट से. २६ निगडी प्राधिकरण या ठिकाणी १६ मे ते एक जूनपर्यंत सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत कागदपत्रांची पडताळणी करून अर्ज दाखल करावेत, तसेच अधिक माहितीसाठी संस्थेशी संपर्क साधावा, असे आवाहन संस्थेचे संचालक डॉ. डॅनिअल पेणकर यांनी केले आहे.